आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ मार्च २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याबाबत राज्य सरकारचा शासनादेश जारी, मार्च आणि एप्रिलमध्ये प्रत्येक शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीनचं वाटप केलं जाणार

- पारलिंगी हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक मागे घेण्याची सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीची केंद्र सरकारला सूचना

- देशभरात रामनवमीचा उत्साह, राज्यात शोभायात्रांसह विविध कार्यक्रमांचं आयोजन

**आणि**

- ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**<><><><><>**

आखाती देशांमधल्या युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेत राज्य सरकारनं पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार राज्यात मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये तिन्ही सरकारी तेलकंपन्यांकडून प्रत्येक शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीनचं वाटप केलं जाणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही, अशी कुटुंब देखील केरोसीनच्या उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील.

एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात वितरित करण्याचे आदेश राज्य सरकारने जारी केले आहेत.

**<><><><><>**

पारलिंगी हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक, २०२६ मागे घेण्याची सूचना, सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीनं केंद्र सरकारला केली आहे. हे विधेयक नुकतंच संसदेत मंजूर झालं होतं. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आशा मेनन यांच्या अध्यक्षतेखालच्या या समितीनं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाला

पत्र लिहून, या दुरुस्तीतल्या काही तरतुदींविषयी गंभीर चिंता व्यक्त करत, कायद्याचा पुनर्विचार करायला सांगितलं आहे. या दुरुस्तीमुळे स्व-ओळख हक्क आणि गोपनीयतेवर मर्यादा येत असल्याचं निरीक्षण समितीनं नोंदवलं. नवीन कायद्यात अपहरण आणि शोषण यांसारख्या गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षा प्रस्तावित आहेत, परंतु हे गुन्हे आधीच इतर कायद्यांतर्गत समाविष्ट असल्याचं समितीनं नमूद केलं आहे.

स्व-ओळख काढून टाकणं हे २०१४ च्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी विसंगत आहे. त्यामुळे भविष्यातली दुरुस्ती पारलिंगींशी चर्चा करूनच करावी, असंही समितीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यासह देशभरात आज चैत्र शुद्ध नवमी अर्थात रामनवमीनिमित्त रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

**नागपूर** मध्ये रामनवमी निमित्त पोद्दारेश्वर राम मंदिर येथून सुंदर चित्ररथांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी प्रभू श्रीरामांना पुष्पहार अर्पण केले. मिरवणुकीत आकर्षक देखावे सादर करण्यात आले होते तसच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलं होतं.

**गोंदिया** शहरात एका युवकाने सहा फुटाची हनुमानाची रांगोळी साकार केली आहे. रामनगर परिसरातल्या राममंदिरात जन्मोत्सव साजरा झाला तसेच तिथून एक शोभायात्रा देखील निघणार आहे.

**नाशिक** मधल्या प्राचीन काळाराम मंदिरात आज ढोलताशांच्या गजरात आणि रामाच्या जयघोषात रामजन्मोत्सव साजरा झाला.

**यवतमाळ**मध्ये आज मोटारसायकल प्रभातफेरी काढण्यात आली होती. तसेच शहरातल्या किन्नर समाजातर्फे राम मंदिरात पितळेची घंटा अर्पण करण्यात आली.

**लातूर** शहरासह ग्रामीण भागातही आज रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व भक्तगण आणि महिला पारंपरिक वेषात सहभागी झाले होते.

**शेगाव इथल्या** श्री गजानन महाराज संस्थानात अध्यात्म रामायण स्वाहाकाराचे आयोजन झालं. राज्यभरामधून आलेल्या शेकडो भजनी दिंड्यांना संस्थानच्या वतीने धार्मिक ग्रंथ तसंच वीणा, टाळ, मृदुंग याचे वितरण करण्यात आले.

**शिर्डी** इथल्या श्री साईबाबा संस्थानात आज अखंड पारायण समाप्तीनंतर श्रींची मिरवणूक काढण्यात आली. श्री साईबाबा समाधी शताब्दी स्तंभाच्या ध्वजाचे पुजन करुन ध्वज बदलण्यात आला.

**<><><><><>**

महिला आणि बाल विकास विभाग आणि सीआयएफएफ अर्थात चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात आज पाच वर्षांचा सामंजस्य करार झाला. या करारात कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी होणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातल्या पहिल्या 1,000 दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी ही मोहीम आहे. या भागीदारीमुळे मातृ आणि बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं आज कोल्हापूर इथं निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज कोल्हापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात लोककल्याणकारी राज्य निर्माण करुन त्या राज्याची घडी आधुनिक जीवन मूल्यांनुसार बसवली हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू पवार यांनी प्रकाशात आणला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचा लढा सुरू ठेवणाऱ्या तसंच करवीर संस्थानच्या संस्थापिका महाराणी ताराराणींचं चरित्र पवार यांनी लिहिलं आहे.

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक - सदस्य आणि काही काळ अध्यक्ष होते. त्यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी या संस्थेची स्थापना केली होती.

पवार यांच्या निधनानं तत्वनिष्ठ, व्यासंगी आणि शांतपणे काम करणारा संशोधक हरपला आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही त्यांना आदरांजली वाहिली आहे.

<><><><>

मालदीवजमध्ये माले इथं सुरू असलेल्या सॅफ अर्थात दक्षिण आशिया फुटबॉल महासंघातर्फे आयोजित वीस वर्षांखालच्या फुटबॉल स्पर्धेत आज भारतानं पाकिस्तानवर ३ - ० अशा गोल फरकानं दणदणीत विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली. या पराभवामुळे पाकिस्तानचं स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

<><><><>

वाढवण बंदर ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासाठी भूसंपादन मोबदला मिळाल्यानंतर भूधारकांनी घाईघाईनं खर्च न करता, तो सुरक्षित पर्यायांमध्ये गुंतवावा, असं आवाहन ही जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी केलं आहे. मोबदला वाटप प्रक्रियेला सुरुवात झाली असून जाखड यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात झालेल्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. भूधारकांना सुलभ आणि पारदर्शक पद्धतीनं मोबदला मिळावा यासाठी जिल्हा प्रशासनानं व्यापक कार्यपद्धती आखली आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

देवीच्या साडे तीन शक्तीपीठांपैकी अर्धेपीठ असलेल्या, नाशिक जिल्ह्यातल्या श्री सप्तश्रृंगी देवीच्या चैत्रोत्सवाला आज मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. २ एप्रिल पर्यंत हा उत्सव चालणार आहे.

<><><><>

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी तपासाला वेग आला असून नाशिक शहरातल्या कॅनडा कॉर्नर परिसरात खरातच्या ओकस प्रॉपर्टी डीलर्स अँड डेव्हलपर्स या कार्यालयात आज फॉरेन्सीक पथकानं सखोल तपासणी केली. यावेळी पथकानं कार्यालयातलं कपाट, टेबल, संगणक आणि इतर साहित्यावरचे बोटांचे ठसे गोळा केले. याशिवाय, प्रिंटर आणि इतर काही चीजवस्तू ताब्यात घेतल्या. संपूर्ण तपासणीनंतर कार्यालय पुन्हा सील करण्यात आलं.

<><><><>

रिलायन्स टेलिकॉम प्रकरणी सीबीआयनं आज मुंबईत छापे टाकले. छाप्यांत कर्ज व्यवहाराशी संबंधित कागदपत्रं जप्त केली असून अधिक तपास सुरू आहे.

स्टेट बँकेच्या तक्रारीवरून कंपनी, तत्कालीन संचालक सतीश सेठ आणि गौतम दोशी यांच्यावर कटकारस्थान, फसवणूक आणि भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. बँकेला तब्बल ११४ कोटी रुपयांचा तोटा झाल्याचा आरोप आहे.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. राज्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळा इतरत्र हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**